

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2390

REFBK-0021761
REFBK-0021761

# नवे घर

निरंजन उजगरे

वि.क्र.
2390

29689
संदर्भ
23/8/66
काव्य

निरंजन उजगरे

2390 काव्य
29689

# नवे घर

REFBK-0021761
REFBK-0021761

निशिगंध प्रकाशन

नौपाडा, ठाणे

निशिगंध प्रकाशन

३, जोग बिल्डिंग, राममारुती जोड रस्ता
नौपाडा, ठाणे ४००६०२ ( टेलिफोन – ५९५७४९ )
नवे घर ( कविता )

© १९७७
निरंजन उजगरे
उषाचंद्र १७ सी. मिनिलँड,
भांडुप ( पश्चिम ) मुंबई ४०००७८

मुद्रक : पु. वि. बेहेरे
मेनका मुद्रणालय, ५६० नारायण, पुणे ३०

प्रकाशक : सौ. ललिता जोशी
निशिगंध प्रकाशन, नौपाडा, ठाणे ४००६०२

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

प्रथमावृत्ती : ११ जून १९७७

मूल्य १० रुपये

मराठी वाङ्मयाचे गाढ व्यासंगी, मराठी भाषापंडित व काव्यरसज्ञ असे माझे पितामह ख्रि. वा. रेव्ह. भास्कर कृष्ण उजगरे यांच्याकडून मिळालेल्या वाङ्मयीन वारसाचे ऋण म्हणून त्यांच्या स्मृतीस अर्पण –

□

माझं हसणं तुमच्यासाठी
तुमच्या ओठी फुलण्यासाठी
माझं गाणं तुमच्यासाठी
तुमच्या मनात खुलण्यासाठी
माझा काल, माझा आज,
माझा उद्या तुमच्यासाठी
सगळं संपल्यानंतरसुद्धा
माझं काव्य तुमच्यासाठी.

## कविता प्रकाशन

मराठा, साधना, उत्तम, ज्ञानोदय, लोकसत्ता, निशिगंध, अश्वमेध, राजस, सह्याद्री, युगवाणी, जिप्सी, नंदा, गावकरी, आपण, भरारी, पैंजण, मार्मिक, राजश्री, नवा काळ, प्रियंवदा, मराठवाडा, सत्यकथा.

# प्रस्तावना

सूर्यप्रकाशाचा रंग पांढरा असतो पण लोलकातून ह्या प्रकाशाचा किरण बाहेर पडताना त्याचा सप्तरंगी पिसारा होतो. तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा आणि जांभळा. ता ना पि हि नि… चं एक इंद्रधनुष्य नील आकाशात उमटतं. कविमनाच्या लोलकातून जीवनप्रकाश अशीच विविध रंगांची पिसं घेऊन फुलत असतो, खुलत असतो. कविता म्हणजे कवीच्या व्यक्तिमत्वातून खुललेलं जीवनाचं अनंतरंगी सुंदर इंद्रधनुष्यच !

निरंजन उजगरे यांचं मन अगदी खुलं, मोकळं आणि निर्मळ आहे. एका विशिष्ट रंगाचा किंवा रुपाचा त्यांना मोह नाही. त्यांच्या वृत्तीत कडवटपणा नाही. वैताग नाही. वैफल्य नाही. अवतीभवतीचं जग ते नीट पाहतात. त्यांच्या टपोऱ्या डोळ्यांची नजर तशी बारीक आहे. तिनं सारं टिपलेलं असतं. स्वीकारलेलं असतं. हे जे टिपलेलं असतं, ते परत देताना मात्र त्यांचं होऊन येतं. अनेकरंगी जीवन त्यातून उमटतं. त्यात सौम्य उपरोध असतो. नर्म उपहास असतो. निर्मळ विनोद असतो. त्यांच्या कितीतरी कविता 'चुटक्या' सारख्या वाटतात. जगातलं सोंगढोंग पाहून त्यावर तीव्र प्रहार करणारं हे मन नाही. माणूस हा प्राणी किती आणि कसा वैचित्र्यपूर्ण आहे याचं खुलं चित्र काढण्यात उजगऱ्यांची कविता संतोष मानते. त्यांच्या कवि-दृष्टीला पक्षपात मान्य नाही. पॉश सोसायटी आणि झोपडपट्टी या दोन्ही वस्तीतलं खरं–खोटं जगणं त्यांना ठाऊक आहे. त्यातील व्यक्ती आणि व्यक्ति-प्रवृत्ती, समाज आणि समाजप्रवृत्ती यांचे मार्मिक स्नॅप्स् त्यांनी घेतलेले आहेत, आणि हे स्नॅप्स् घेताना ते बेचैन झालेले नाहीत. माणसाच्या दोषांची, उणी-

वांची, त्याच्या अपप्रवृत्तींची चित्रं ते काढतात पण ती पाहून आपल्या ओठी हसू फुटतं. कोणाची घृणा किंवा राग येत नाही. उलट दुःख आणि करुणाच वाटू लागते. ‘ नटीचा मुलगा ’, ‘ काळूदादा ‘, ‘ दहावीच्या बाई ’ या कविता सहज पाहिल्या तरी हे ध्यानी येते. माणूस आणि माणसाची संस्कृती कशी नकली–नाटकी असते आणि ती कशी सत्य–सुंदरही असते याची बहुबोलकी चित्रं या कवितांत उजगरे यांनी काढली आहेत.

व्यक्तिचित्रे ही उजगऱ्यांच्या कवितेचा खास विशेष आहे. खरी तर ही एकेका व्यक्तिमनाची चित्रणे आहेत. पण त्या सर्वांचं मिळून आजच्या एका जीवनप्रवृत्तीचं चित्र मनात उमटतं, इतकी त्या व्यक्तिचित्रांमध्ये विविधता आहे. बसकंडक्टर, टॅक्सीड्रायव्हर, हॉटेलमधला वेटर, इराणी, माकडवाला, साईड हिरो, दलाल, एका वस्तीतला दादा इत्यादी माणसं ही नित्यातली, पण आजवर कवितेत कधीही स्थान न मिळालेली माणसं आहेत. उजगऱ्यांना ती महत्त्वाची वाटलेली आहेत. ह्या माणसांच्या वैयक्तिक दिनक्रमातून त्यांचं व्यक्तिगत सुखदुःख त्यांनी दर्शवलं आहे व त्यांच्या एकत्रित दर्शनातून एका वेगळ्या संस्कृतीचा आडवा छेद ते घेत आहेत असंच जणू जाणवतं.

उपेक्षितांच्या या व्यक्तिचित्रांबरोबरच उच्चभ्रू समाजातील ‘ डिनर ’, प्रतिष्ठितांची भाषणे, त्यांच्या निवडणुका, समाजसेवक व त्यांचे कर्तृत्व, स्मगलर यांची पारदर्शक शब्दचित्रे उजगऱ्यांनी रेखाटली आहेत. ही निरीक्षणे सूक्ष्म व मार्मिक तपशिलांनी भरगच्च झाली आहेत. इथे तपशील हाच चांगल्या अर्थाने प्रभावी ठरतो आहे. या तपशिलातूनच उजगरे या संस्कृतीचे अंतरंग उघड करतात. या तपशिलात मिस्किलपणा, खोडकरपणा, पुरेपूर आहे. तो हलकाफुलका पण सच्चा आणि निकोप आहे. रेशमी चिमटे घेता घेता मध्येच हसत हसत चिमटा चांगला पिरगळून घेण्याचे कसबही उजगऱ्यांना चांगलेच साधले आहे. पाडगावकरांच्या ‘ विदूषक ’ मधील काही भावच्छटांची इथे आठवण होते.

उजगऱ्यांच्या ह्या कविता शहरी जीवनातल्या–खास मुंबईतल्या आहेत. ही माणसं मुंबईतली आहेत. त्यांची स्वतःकडे, आणि एकूण जीवनाकडे पाहण्याची दृष्टी मुंबईची आहे. ‘ बाजार ’ आणि ‘ व्यापार–रस्ता ’ ह्या कविता तर डोळ्यांपुढे चक्क मुंबईच उभी करणाऱ्या आहेत. ही कविता

खास आजची कविता आहे. एका सरळ साध्या पातळीवरून दिसणाऱ्या वास्तवाची झराझर स्केचेस काढणारी ही कविता आहे. प्रतिमांपेक्षा वास्तव–रेखांवरच उजगरे अधिक विसंबून राहतात. वर्णनात सूचकतेपेक्षा पुष्कळदा विस्तारही होतो. प्रसंगी शैली खूपच मुक्त होते, म्हणजे गद्यरूपात केवळ ताल सांभाळू पाहते. पण तरीही या कवितांना आपली एक विशिष्ट वाचन–रीती आहे. ह्या कवितांत एक अंगभूत नाटय आहे... काही कविता तर उत्तम नाटयछटा वाटाव्यात अशा आहेत. यामुळे या कविता त्यातील उपरोध आणि विनोद ध्यानी घेऊन विशिष्ट ओघात आणि विराम घेत घेत वाचल्या तर त्याची आपापत: जाणवणारी गद्यप्रायता खूपशी कमी होते. तिला एक स्वत:चा स्वतंत्र ओघ व शैली आहे, हे प्रत्ययास येते.

आज मराठी कविता वस्तुनिष्ठ झाली तर ती अपवादानेच होते. उजगरे यांनी मात्र वेगळी माणसे, त्यांची वेगळी सृष्टी, वेगळी संस्कृती मराठी कवितेत आणली आहे. पण या गर्दीत ते स्वत:ला विसरलेले नाहीत. अंतर्यामी ते कितीतरी मृदुकोमल भावगंध जपून ठेवताना दिसतात. निळ्या आभाळावर, झिमझिम पडणाऱ्या पावसावर, उमलत्या कळ्या–फुलांवर त्यांचं प्रेम आहे... स्नेहाची, श्रद्धेची, भक्तीची आणि प्रीतीची ज्योत त्यांच्या अंतरांतरी कुठेतरी स्थिरपणे तेवत असल्याचं जाणवतं. माणसाचे बरे–वाईट नमुने पाहूनही माणसात मूलत:च काहीतरी प्रेम करण्यासारखं, अनावर ओढ लावणारं आहे यावरील त्यांचा विश्वास ढळलेला नाही.

बापूसाहेब माटे यांना उपेक्षितांच्या अंतरंगात जसे काही कोमल, सुसंस्कृत भाव दिसले तसे उजगरे यांनाही काही समाजकंटकांच्या हृदयी नाजुक भावरेषा उमटलेल्या दिसल्या आहेत. आणि यामुळेच 'माझं काव्य तुमच्यासाठी' असं म्हणतच ते रसिकांपुढे येतात. 'अनामिक', 'रिमझिम', 'पालवी', 'पहाटवारा', 'स्वप्न', 'दुवा', 'वाटलं' इत्यादी त्यांच्या कविता म्हणजे जीवनाच्या माळरानास नवे जीवन देऊ पाहणाऱ्या कविता आहेत. या कवितांची जात आणि पोत फार वेगळी आहेत. 'नेत्र' ही कविता तर परमगंभीर आहे. उजगऱ्यांच्या कवितेत क्वचितच एखादवेळी 'हे सगळं झूट आहे' असा सूर जणू अपवाद म्हणूनच उमटतो. त्यांची अंतर्लक्षी कविता भावार्त आणि खूपशी व्याकुळ अशीच आहे.

निरंजन उजगरे यांची कविता मी गेली सात–आठ वर्षे पाहत आलो आहे. सध्या व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनियर असलेले ते एकेकाळचे पार्ले कॉलेजचे विद्यार्थी. कॉलेजच्या मराठी वाङमय मंडळात त्यांनी आपल्या काही कविता वाचल्या होत्या. आकाशवाणीवरही त्यांचे कवितावाचन अनेकदा झाले आहे. आणि काव्यवाचनाचे जाहीर कार्यक्रमही त्यांनी यशस्वीपणे केलेले आहेत. त्यांच्या कविता आजवर वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या आहेत. आपला पहिला कवितासंग्रह घेऊन ते आता रसिक मित्रांकडे आले आहेत... त्यांचे आपण खुल्या दिलाने स्वागत करू या. त्यांना उज्वल यश चिंतू या. त्यांची कविता अधिकाधिक आशयघन आणि कलासुंदर होवो असे मनोमन इच्छू या !

– डॉ. व. दि. कुलकर्णी

## शीर्षक

'ह्या कवितेचं शीर्षक काय ?'
फेसाळणाऱ्या सांजरंगी
सागराचं शीर्षक काय ?
कवडश्यातील प्रकाशवेड्या,
धुलीकणांचं शीर्षक काय ?
चांदण्याने हुळहुळणाऱ्या,
तलावाचं शीर्षक काय ?
हृदयातून मिणमिणणाऱ्या,
भावनांचं शीर्षक काय ?
ह्या कवितेचं शीर्षक काय ?

१६–४–१९७३

## माकडवाला

' बच्चे लोग टाली बजाव
और जोरसे और जोरसे
उठो मेरे दिलीपकुमार
भाईसाबके नजदीक जाव
चार आना लेकर आव – '
ढुम् ढुम् ढुम् ढुम् ढुम्...

दिवसभर हाच मंत्र,
माकडवाला जपत असतो...
पांढरा लेंगा, करडी बंडी
डोक्यावरती काळी टोपी
हातामध्ये लांब दोरी
दिलीपकुमार खांद्यावरती
घेऊन अनाथ माकडवाला
वणवण फिरतो रस्तोरस्ती
गल्ल्यांमध्ये, फुटपाथवरती
लांबलचक क्यूवाल्या
कंटाळलेल्या बस–स्टॉपवरती
मधल्या सुट्टीत शाळेपुढे
रंगीत धुंद संध्याकाळी

चौपाटीच्या वाळूमध्ये ...
काही टारगट खडे मारतात
थोडे लोक पैसे देतात
बरेचसे नुसतेच बघतात
खेळ संपत आला असता
घड्याळाचे काटे पाहून
हळूच काढता पाय घेतात ...
माकड आणि मालक दोघे
एकसाथ मिसळ खातात
चहा पाव कधी चिवडा
एकमेकांस राखून खातात ...

आभाळावर काळोखाचे
पाश हलकेच घट्ट होतात
मारुतीच्या पारावरती
थकून भागून दोघे येतात ...
टोचत असते बोचरी थंडी
माकडवाला आपली बंडी
पसरून टाकतो माकडावरती
आणि पुटपुटतो त्याच्या कानी,
'शिवायची हं लवकर तुला
मखमलीची लाल बंडी
चमचमणाऱ्या आरसेवाली ...'

माकड हळूच डोळे मिटते
आपला एक हात उचलून
अनाथाच्या गळ्यात टाकते ...

११-५-१९७२

# नटीचा मुलगा

'फक्त प्रौढांसाठी '
मोठ्या नव्या पोस्टरमध्ये
तोकड्या कपड्यात आई दिसते
रस्त्यावरच्या मवाल्यांची
नजर तिकडे रुतून बसते–
छोट्या मुठी उगीच वळतात
पाचगणीच्या थंड हवेत
त्याच्या छातीत अंगार फुलतात
अवघडलेले त्याचे पाय
नाईन्थ स्टँडर्डमध्ये शिरतात...
मॅडम सायन्स शिकवत असतात
त्याच्या डोळ्यांत सिनेमातली
फालतू दृश्ये गर्दी करतात
हिरोच्या बोटात गुंफून गेली
आईची बोटं खुपून बसतात
गाणं गाणारे रंगीत ओठ
मस्तकाला जाऊन भिडतात...
बाबा ?––
ते तर दुसऱ्या आईस घेऊन
अमेरिकेत गेलेले असतात...

कोंबडीच्या मऊ पंखाखाली
छोटी पिल्लं हळूच शिरतात–
त्याला खूप एकटं वाटतं
कोणीतरी खूप–खूप ...
जवळ घ्यावं असं वाटतं–
होस्टेलमध्ये झोपता झोपता
डोळ्यांपुढे पोस्टर येतं ...
कोंबडीची पिल्लं मोठी होतात.
गोऱ्या तगड्या हिरोबरोबर
त्याच्या आईचं लग्न होणार
म्हणून पेपरात बातम्या येतात
तो उगीच ढासळतो
'सगळं खोटं' मनात म्हणतो
त्याचा समज मनातच भिजतो
चित्रपट-मासिकात ठळकपणे
आईच्या लग्नाचा फोटो येतो ...
नवविवाहित फिल्मी जोडा
दार्जिलिंगला रवाना होतो
दोन बापांचा, दोन आयांचा
तडफडणारा 'अनाथ' मुलगा
शाळेमध्ये सुसाट पळतो
चर्चमधील सिस्टरच्या
कुशीत शिरून खूप रडतो ...

३०–४–१९७३

## वेटर

आईस्क्रीम–कोल्ड्रिंक वाटता वाटता
लग्नमंडपात जन्म गेला
कितीतरी मंडळीला
त्याने केक–चिवडा दिला...
बँड–ताशे ऐकून–ऐकून
त्याचा कान थकून गेला
ट्रे घेऊन फिरता फिरता
पाठीमध्ये पोक आला
पांढऱ्या शुभ्र कपड्यांखाली
झाकला सापळा कसा-बसा...
रोषणाईचा, सुगंधाचा
किलबिलण्याचा, खिदळण्याचा
नवेपणा निघून गेला
निसटणारा स्पर्शसुद्धा
आता सवयीचा झाला...

आज मात्र त्याचा विचार
भूतकाळात सळसळला
नव्या नवरीकडे पाहून
एक चेहरा त्याला आठवला...

प्रेमात तिच्या त्याने आपला
प्राण होता ओवाळला
सर्वच प्रेम तिला दिलं
काहीच नाही शिल्लक ठेवलं–
आणि तिच्याच लग्नात त्याने
आईस्क्रीम होतं सर्वांस वाटलं...

सहज आठवलं–थरथरलं
मन एकदम हळवं झालं
भूतकाळात काही क्षणात
ढवळून गेलं, चिंब झालं...

'वेटर ! एक आईस्क्रीम इकडे आण
वेड्यासारखा बघतोस काय ?'
वेटर भानावरती आला
पाहुण्यांना बश्या वाटत
हळू–हळू पुढे गेला...

१४–५–१९७१

# डिनर

दचकता काय ? रूबाबात चला
सुटातला माणूस तो पहा आला
एअर–कंडीशन्ड खोली निळसर
सजली आहे तुमच्याचसाठी
तुमच्या एका डिनरसाठी...
गिटार आहे, माईक आहे
ड्रम आहे, बॅन्ड आहे
सगळं काही चोख आहे
बसवायला पण माणूस आहे...
बसलात ? नाऊ रिलॅक्स !
शांतपणे, सराईतपणे
भिंतीवरचे आरसे बघत
पब्लिककडे नजर टाकत
बॅन्डवरती ताल धरत
सिगारेटची मजा चाखत...
ऑर्डर घेण्यास वेटर आला
सहजपणे त्याला सांगा
'सुपानंतर फ्राईड फिश
मेन डिश, स्वीट डिश
शेवटी एक कॉफी रिच ! '...

आता पुन्हा म्युझिक ऐका
माईकवाल्यास चॉईस सांगा
ड्रमवाल्यास टाळ्या द्या—
जेवण आपले चालू ठेवा...
' अटेन्शन प्लीज प्रेझेंटींग यू
कॅरलीन— अ फ्लॉवर विथ ड्यू...'
कॅबरे डान्सर आली पहा
याहू ऽऽ वाहा ! वाहा ! !
इतकं मात्र आता करा
खुर्चीखाली चेहरे ठेवा
खिशामध्ये नावे घाला
जॉन, डेंझील, डॅरील बना
कॅरलीनची मजा करा
शिट्या मारा धुडगूस घाला
स्टेजवरती जाऊन नाचा
तुमचा तिने शर्ट काढला
तरी तुम्ही लाजू नका—
आता तुम्ही जॉन आहात...

जेवणं झाली, डान्स झाला
स्वप्नसृष्टीत तुम्ही गेलात
आता फक्त इतकंच करा
रॉयल असं बिल भरा
गालिचावर पावलं रोवत
दरवाजातून बाहेर पडा
बसस्टॉपवरती उभे राहा...

२८–३–१९७०

## समाजसेवक

रूंद मऊ गालिचावर
त्याचं पाऊल ठरत नाही–
लो–नेक, मिनी कपडे
त्याच्या नजरेत भरत नाहीत–
‘सो स्मार्ट, सो हँडसम…’
किणकिणणाऱ्या नाटकी हास्यात
त्याचे कान रूळत नाहीत–
खारट काजू, उंची मद्ये
मसालेदार लझीझ खाद्ये
त्याच्या जिभेस भुलवत नाहीत–
इलेक्शनचा विचारसुद्धा
त्याच्या मनात येत नाही
त्याला बेहोष करीत नाही…
फुटपाथवरती, झोपड्याझोपड्यांत
चिरगुटलेल्या मळकट चाळीत
त्याची पावले स्थिर होतात–
कळकट भांडी, भुरकट पोरे
चिंध्रीवजा गोधडीतले
करूण वृद्ध दोन डोळे
त्याच्या नजरेमध्ये आर्द्र होतात–

वेडा आक्रोश अन्नासाठी
आजाऱ्यांची दुखणी कण्हणी
आंधळ्याच्या एकतारीच्या
आर्त ताना त्याला वेढतात
त्याच्या कर्णात सदा घुमतात–
कानतुटक्या कपामधला
लाल पाणचट गरम चहा
इनॅमलच्या बशीमधला
खारा, मळकट बिस्कीट तुकडा
देणाऱ्याच्या नजरेमधला
निष्पाप आनंद पाणावलेला
त्याची भूक शमवून टाकतात–
संसार नाही, आप्त नाही
समाजसेवा कर्म आहे
माणुसकी हा धर्म आहे
हेच त्याच्या जीवनाचे
दाहक कठीण मर्म आहे...

११–५–१९७२

# कर्तृत्ववान्

काय म्हणता ?
सत्तावीस तारखेला ?
जमणार नाही
जायचंय दिल्लीस
कॉन्फरन्सला ...
हल्ली फारच अवघड झालंय्–
उद्याच उद्‌घाटायचंय्
एक प्रदर्शन
प्रतिष्ठित लोकांपुढे
परवा द्यायचंय
स्टडीत भाषण
नंतर रात्री ताजमध्ये
एक डिनर घ्यायचं आहे ...
तेरवा मात्र बरं आहे
कुमारांचं गाणं आहे
पण काय करावं समजत नाही
हैद्राबादच्या सेमिनारचं !
शिवाय पडलंय बरंच काम
आपल्या समाजजागृतीचं ...
मुलं चांगली शिकत आहेत

डॉक्टर–इंजिनियर होत आहेत
अजूनसुद्धा धाकात आहेत
पत्नी साथ देते आहे
सगळं कसं उत्तम आहे...

विश्वास ठेवा एका काळात
त्यांनी पाहिलीत सगळी दुःखे
जीवनाच्या करपट वाटेत
त्यांचीसुद्धा भाजलीत पावले...
कमालीच्या धडाडीने
आणि आत्मविश्वासाने
कणखर अशा कर्तृत्त्वाने
जिंकली त्यांनी सगळी युद्धे...
सर्वस्वाची करून शर्थ
करून सार्थ पौरूषार्थ
समजावला महान अर्थ
नाही जाणार कधी व्यर्थ...

२८–३–१९७१

## प्राध्यापक विद्वान

विद्वानांचं भरदार पाऊल
वर्गामध्ये जेव्हा पडतं
किलबिलणाऱ्या चार भिंतींस
गांभीर्याचा रंग चढतो...
विद्वानांचा शब्दन् शब्द
मन लावून ऐकला जातो
वह्यांमध्ये टिपला जातो—
मध्येच कोणीतरी शिंकतो
वर्गाबाहेर काढला जातो
विद्वानांचा पाठ तसाच
कडक इस्त्रीत पुढे जातो...
मिनिटे संपतात
चष्मा हळूच बंद करून
एक छोटं स्माईल देऊन
किलबिल पुन्हा वर्गात ठेवून
प्राध्यापक विद्वान, स्टाफ-रूममध्ये शिरतात...
पॉलिटिक्सवर चर्चा करतात
नामदेव—संप्रदायामधील
साहित्यावर विचार मांडतात
नव्या काव्यावरती नंतर

समर्थ-समग्र टीका करतात-
एक कडक चहा घेतात...
संध्याकाळची पाखरं उडतात
विद्वानांच्या मनामध्ये
एके काळी फुलारलेले
मखमलीने मढवलेले
निळे, स्वप्निल दिवस येतात-
प्राध्यापक घरी येतात...
पेनासकट बुशकोट आपला
हँगरवरती लटकवतात...
इतक्यात त्यांची छोटी नात
दुडुदुडू धावत येते
गळ्यात हात घालून म्हणते,
'आजोबा, आज किनई
आम्ही खूप मज्जा केली
छोट्या-पांढऱ्या माऊबरोबर
खूप-खूप मस्ती केली !
आजोबा,
तुम्ही का करत नाही ?
तुम्हाला काहीच कळत नाही ! ...'
प्राध्यापक विद्वान आपल्या
मिशीमध्ये मिष्किल हसतात
बडबडणाऱ्या चिमुरडीचा
एक गोड पापा घेतात...

२४-८-७१

## हे पण ‘ मराठी ’

घरातल्यांना मम्मी–डॅडी
बाहेरच्यांना अंकल–आँटी
‘ माफ करा ’ काहीतरीच
म्हणत जावं, ‘ एस्क्यूज मी ! ’

‘ शेक्सपियर इलियट ग्रेट होते. ’
माफ करा, इतकं सांगा
‘ एकच प्याला ’ कोणी लिहिले ?
‘ हं ! कोणीतरी लिहिले खरे ! ’

‘ नॅटकिंगकोलची सेंटीमेंटल
गाणी किती स्वीट असतात ’.
‘ काय ? भावगीतं ?
उगीच फार रडकी वाटतात ! ’

बीट्सवाली गाणी ऐकून
तंगड्यात त्यांच्या जोर येतो
पोवाड्याच्या डफामधला,
दणका त्यांना कळत नसतो…

अॅडमिशनचा फॉर्म घेऊन
किंडरगार्डनमध्ये शिरतात
' एम् ए आर् ए टी एच् आय् '
' मदर टंग 'च्या पुढे लिहितात...

२३-११-१९६७

# प्रतिष्ठित भाषण

प्रतिष्ठितांच्या भाषणास
प्रतिष्ठित लोक येतात
पॅन्टच्या इस्त्रीस सांभाळून
खुर्चीवरती हळूच बसतात...

इकडे–तिकडे उगीच बघतात
रूमालाने तोंड पुसतात
ओळखीचा चेहरा–मोहरा दिसताच
तोंड भरून उगीचच हसतात...

जेव्हा भाषण सुरू होते
तेव्हा त्यांची ‘ तंद्री ’ लागते
जांभई दाबून गालामध्ये
‘ तोंड पुसतात ’ रूमालाने...

चांगले वाक्य पाच टाळ्या
जोरदार वाक्य दहा टाळ्या
फोटोग्राफर जवळ येताच
‘ तन्मयतेने ’ भाषण ऐकतात...

साधा विनोद ' प्रचंड हशा '
लोक आपणास हसतील म्हणून
चांगला विनोद कळला नसून
उगीचच हसतात ' बाजूस ' बघून...

प्रतिष्ठित भाषणे अशीच असतात
लांबून लांबून लोक येतात
उगीचच हसून टाळ्या देतात
प्रतिष्ठा आपली वाढवून घेतात...

२३–७–१९६७

# एक तरुण

हाय–बाय संस्कृतीनं
पछाडलेलं त्याला जीवन
कधी वाटतं डॅम बोअर...
धुरकटलेल्या डबा छातीत
लपलंय त्याचं दुबळं मन
आगा नाही, पिछा नाही
अभ्यासाशी जमत नाही
भरकटलेल्या विचारांच्या
दिमतीस आहे, फियाट गाडी...
पॉप–ठोठो रेकॉर्डस्‌मध्ये
सूर शोधतोय, ठेका धरतोय
सिनेमाच्या विश्वामध्ये
विरघळण्याचा यत्न करतोय्
पूज्य पिताजींनीसुद्धा,
त्याला मार्ग दिला नाही
फक्त दिला काळा पैसा
केविलवाणं झिंगण्यासाठी
मिटिंग्ज, पार्ट्या, क्लब्स, रमी
यातच रंगली त्याची मम्मी
स्निग्धतेची, वात्सल्याची

त्याची भूक वखवखलेली
निश्चय नाही, ध्येय नाही
सगळंच कसं अधांतरी
धुरकटलेलं, भरकटणारं
त्रिशंकूचं त्याला जीवन
कधी वाटतं डॅम बोअर

१८-६-१९७१

## सुखी माणूस

सहज मनात आलं म्हणून
खंडाळ्याला घर बांधलं
कधी–काळी ' वीक-एंड 'साठी
स्वस्थ, मस्त पहुडण्यासाठी...
डॉज थोडी जुनीच झाली
म्हणून त्याने मर्स घेतली.
' बर्थडे प्रेझेंट ' म्हणून बायकोस
प्लॅटिनमची अंगठी दिली...
कालच घरी पार्टीसाठी
नटून–सजून जमली होती
' क्रीम ' हायर सोसायटीची
ड्रॉइंगरूम हसली–खिदळली
फेसाळलेली किणकिण झाली
' इम्पोर्टेड 'च्या अंमलाखाली
रात्र कशी एन्जॉय केली
बरं झालं मुलं दोन्ही
दार्जिलिंगला गेली होती
शाळेमधून पिकनिकसाठी...
सगळं कसं पॉश चाललंय.
सुखामध्ये जीवन बुडलंय...

तो तरी काय करणार ?
आजोबांची–पिताजींची
अमाप इस्टेट त्याची झाली
लक्ष्मी धावत–पळत त्याच्या
पायावरती येऊन पडली
नशिबाने स्वतः येऊन
मनोभावे सेवा केली ...

१–८–१९७१

## एक निरीक्षण

काळेभोर टपोरे डोळे
गो गो गॉगलखाली झाकतात
लांबसडक केस आपले
सरळ सरळ कापून घेतात
नाहीतर –
गुंता करून डोक्यावर
स्प्रे मारून घरटी करतात...
गोजिरवाणं रूपडं आपलं
मेकअप चोपडून मळवून घेतात
पाकळीसारख्या ओठाला
लिपस्टीक लावून प्लास्टीक करतात...
भिवयांना प्लक करतात
पापण्यासुद्धा खोट्या लावतात
स्मार्ट-क्यूट बनण्यासाठी
नाजुक मार्दव नाकारतात–
समजत नाही का उगीच
रूपाचं बेरूप करून घेतात...
साडी किती खाली जाते
ब्लाऊझ किती वर सरते
याच्याकडे लक्ष असते

समाजाच्या नजरेकडे
त्यांची कधी दृष्टी नसते...
मग काही झाल्यावर
सगळं काही गमावून बसतात
समाजाला शिव्या देत
नशिबाला दोष देतात...

२२-२-१९७१

## तो समंजस आहे

तो समंजस आहे–
तो डोळस आहे...
भुकेकंगाल दुर्दैव्यांच्या
मासिकातून चित्रे बघत
चवदारपणे कोंबडी हाणतो
दुष्काळावर गप्पा मारीत
मदिरेचे घुटके घेतो
स्त्रियांवरील अत्याचार
मिटक्या मारीत वाचून काढतो
अडचणग्रस्तांस अचूक हेरून
इच्छा-वासना शमवून घेतो
पापांच्या गळत्या घड्यावरती
काळे पैसे डकवत जातो...
त्याचा फायदा त्याला समजतो
त्याचा स्वार्थ त्याला दिसतो
म्हणून म्हणतो
'तो समंजस आहे–
तो डोळस आहे... '

२९–११–१९७२

# काळूदादा

खडबडीत बेडर उग्र चेहरा
काळा देह कमावलेला
लालभडक लुंगी आणि
गंजीफ्रॉक जाळीवाला
गल्लीवरच्या फुटपाथरती
नवारीची बाज टाकून
उशीखाली सात कटकी
रामपुरी ' काटा ' ठेवून
मोहल्ल्याचा राकट राजा
काळूदादा बिनधास्त वसला...
गणपत पोलीस ' सलाम दादा '
म्हणून मुंडी खाली घालतो
हॉटेलवाला न सांगता
शेवचिवडा पाठवून देतो
' कैसे हो चिमणशेठ – '
ओठांमध्ये हसू घोळवत
पाच रुपये चिमण देतो...
आज मात्र काळूदादा
सकाळपासून उपास करतो
पवित्र रक्षा बंधनाचा

आज मंगल दिवस असतो...
पंधरा वर्षांपलीकडे
त्याची नजर थेट जाते–
दोन पोरकी बहीण भाऊ
धाकटी मंजू, बाळू मोठा
मंजूच्या लग्नात हुंडा म्हणून
तीन हजार मागणारा
प्रतिष्ठित ढोंगी गोपाळदादा
हाता-पाया पडूनसुद्धा
लग्नसंबंध तेव्हा मोडला–
दुसऱ्या दिवशी विहिरीतून
दोर लावून उपसलेला
मंजूचा देह निष्प्राण, कोवळा–
गोपाळवरती केलेला
धगधगलेला सुरीहल्ला
तुरूंगवास लंबाचौडा
बाळूमधून उफाळलेला
गुन्हेगार काळूदादा...
लाऊड-स्पीकर कोपऱ्यावरचा
गात असतो स्वरात मोठ्या
'मेरी प्यारी बहनिया
बनेगी दुल्हनिया...'
अस्वस्थ बेचैन काळूदादा
बाजेवरून उगीच उठतो
चिमणशेठच्या दुकानातील
चमचमणाऱ्या राख्यांकडे
खिन्नपणे टक लावतो
बाजेवरती पुन्हा बसतो
जळजळीत हातभट्टीची
बाटली सरळ तोंडास लावतो...

२५–३–१९७३

## सतारिया

आभाळाच्या कपाळावर
चंद्रबिंदू स्थिर झाला
रस्त्यावरती पिवळा दिवा
मंद प्रकाश थरथरणारा
सगळं कसं संथ–निर्जीव
एकटं ... गहिरं ...

फुटपाथजवळ उगवलेल्या
झोपडीपुढे लक्तरलेल्या
मधुवंतीत बुडून गेला
एक धुंद सतारिया ... ...
संकटांनी झोडपलेले
त्याच्याजवळ जीवन आहे
नियतीने उधळलेले
संसाराचे चित्र आहे
खूप दूर गेलेल्यांची
मनामध्ये याद आहे
पोटामध्ये आग असून
बोटांमध्ये जीवन आहे ...

स्वरांमध्ये उमलून आला
हृदयाचा आर्त कोपरा
मधुवंतीत बुडून गेला
एक धुंद सतारिया ...

१४–६–१९७१

## वाढदिवस

तीस उन्हाळ्यात करपलेल्या
पाठीवरती चिप्प बसलेल्या
कारकुनीने पिचून गेलेल्या
शिकवणीने पिवळटलेल्या
जाळीदार बनियनचा
बोळा त्याने काढून फेकला...
दिवा मालवला...पलंग करकरला
तिच्या-त्याच्यात विसावलेला
गजांमधून निसटलेला
चंद्रकिरणी मऊ कवडसा
हळुवार त्याने जपला
डोळ्यांत साठवत झोपी गेला-
वाढदिवस त्याचा संपला...

३१-१०-१९७३

## वाट बघतोय

कोणी एक वाट बघतोय
युद्धबंदी उजाडण्याची
तर कोणी अणूस्फोटात
शत्रू देश होरपळण्याची...
सायंकाळी वाळूवरती
कोणी आपल्या प्रेयसीची
तर कोणी गलबतातून
चोरटा माल उतरण्याची...
कोणी एक वाट बघतोय,
झिंगून गेल्या मेजवानीची
तर कोणी वाडग्यामध्ये
भाकरतुकडा खडखडण्याची...
कोणी एक वाट बघतोय,
कर्करोगास हरवण्याची
आणि कोणी सुखरूपपणे
चांद्रवीर परतण्याची...
दूर एका फुटपाथवरती
पिळवटलेला एक मुडदा
कधीपासून वाट बघतोय
निर्विकार चेहऱ्याच्या
पांढऱ्या प्रेतवाहिनीची...
२९-११-१९७२

## कर्तारसिंग

बी. एम् आर.
तीन, नऊ, सहा, चार
रस्त्यामधून पळते आहे
'टॅक्सी ऽऽ...' ऐकताच
थांबते आहे, सुटते आहे
वळते आहे...
टॅक्सी–ड्रायव्हर कर्तारसिंग
जाड कोटात भिजतो आहे
झुपकेदार करड्या मिशा
बोटांवरती तोलतो आहे...
वीस वर्षांपासून कर्तार
'जितकी पळवीन, तितके कमवीन'
हाच हिशोब करतो आहे
अजून बरंच बाकी आहे
मोठ्या मुलास संशोधनास
अमेरिकेत जायचं आहे
दुसऱ्या मुलास डॉक्टर होण्यास
दीड वर्ष बाकी आहे.
नाजुक, सुंदर रेशमाराणीस
चांगल्या घरी द्यायची आहे

सर्वात लहान अजितसिंगास
मेजर–कर्नल व्हायचे आहे...
घामेजलेल्या कर्तारसिंगास
दिवंगत पत्नीस दिल्या
वचनांची जाणीव आहे
खिशामधील मळकट डायरीत
जपून ठेवला तिचा फोटो
अधून मधून चाचपत आहे
बी. एम्. आर.
तीन, नऊ, सहा, चार
रस्त्यामधून पळते आहे...

६–३–१९७३

# दयालदास

एके दिवशी सिंध प्रांतात
दयालदास आला जन्मास
बऱ्याच भावंडांच्यामध्ये
खेळू लागला काही काळात...
अत्तरवाल्या बापाने
दयालदासला शाळेत टाकला
चार 'बुके' तेथे शिकून
दयालदास धंद्यात पडला
गल्ल्यावरती बसू लागला...
'धंदे' तेथे बरेच शिकून
दयालदास मोठा झाला
गल्लीमधील चंद्रूचा
एक दिवस पती झाला...
मग भयानक काळ आला
त्याचा प्रांत फाळणीमध्यें
पाकिस्तानात जाऊन पडला—
सारी नाती मग झुगारून
हृदयाचा दगड करून
चंद्रूला अन् बरोबर घेऊन
कत्तलीतून मार्ग काढून

दयालदास भारतामध्ये
कसाबसा पडला येऊन...
चंद्रू होती हुशार फार
आणले तिने एक लाटणे
एक पोळपाट, थोडे मीठ
आणि पिशवीभर
पापडाचे पीठ...
भराभर पापड लाटले
कोठे तरी वाळण्यास टाकले
दयालदासने गिऱ्हाईक शोधून
नफा काढून पापड विकले—
कष्ट काढले, उपास केले
दोन-दोन पैसे जमू लागले...
जेव्हा पैसे बरेच जमले
उडीद घेऊन दळून आणले
विनातिकिटी प्रवास करून
मुंबापुरीस चिकटून बसले...
तेथे जाऊन तेच केले
पापडावरती पैसे केले
दयालदासचे डोके चालले
गोदीजवळील कोन्यावरले
खोपटे त्याने विकत घेतले
तेथेसुद्धा पापड विकले
खलाशांना फुकट दिले...
हळू-हळू दोस्ती वाढवून
त्याने आपले 'काम' साधले
दयालदास पापडवाले
एक दिवस 'स्मगलर' बनले...
भाग्य त्याचे मग उघडले

पाण्यासारखे पैसे आले
नावासाठी धंदा म्हणून
कपडयांचे एक दुकान उघडले
दयालदासने घर बांधले
पगडी घेऊन पैसे केले
इन्कमटॅक्सच्या ऑफिसमध्ये
सर्वांस त्याने 'खूष' ठेवले...
थोड्याच काळात खूप झाले
चंद्रूसाठी सोने आले
दयालदासच्या अंगठ्यामधून
'काही' हिरे चमकू लागले
सिंधमधील दयालदासचे
जीवन सुखात सुरू झाले...

१७–५–१९६७

## सोपाना

‘ शिवायचंय ऽऽ… ’
मळकट धोतर, ठिगळ–सदरा
पागोट्याच्या गुंत्याखाली
कपाळावर भक्कम टिळा
पाठीवरचा उतरून थैला
हत्यारांचा उपस झाला–
सुई, वापी, पक्कड, दोरा
पाण्यासाठी गोल डबा
ब्रश, पॉलिश, रेशमी फडका
छोट्या–मोठ्या अनेक चुका …
बूट शिवता–शिवता एकदा
आठवला त्याला त्याचा मुलगा
खस्ता खाऊन, रक्त आटवून
इंटरपर्यंत शिकवलेला
स्वच्छ कपडे, बूट घालून
ऑफिसमध्ये जाणारा
फोर्टमधील पोऱ्याकडून
बुटास पॉलिश करणारा
सोसायटीच्या घरामध्ये
बायकोस घेऊन राहणारा–

पाच वर्षांपूर्वी आपल्या
जन्मदात्या वृद्ध पित्यास
दंडास धरून हाकणारा
पुन्हा कष्टात ढकलणारा...
सोपानाचा बारीक देह
अचानक थरथरतो
दुखरा आणि थकला डोळा
पापणीखाली पाणावतो
थरथरणारा वृद्ध हात
हत्यारांना सावरतो
रखरखीत दुपार छेदत
फाटका स्वर उमटतो–
' शिवायचंय ऽ ऽ ...'

२७–८–१९७२

# झूठ

कधी सगळंच झूठ वाटतं
आपल्या आरोळ्यांनीसुद्धा
कोणी होत नाही जागं
जग ठार बहिरं असतं
माणुसकीच्या पडद्यामागे ...
आपलं रक्त शोषलं जातं
मुंडकी उडतात, धडं तडफडतात
गिधाडांच्या पंगती उठतात
लाज, अब्रू, नीतिमत्ता
चेचून–भोसकून टांगल्या जातात
हपापलेले, वखवखलेले
सैतानाचे खेळ चालतात–
माणुसकीच्या पडद्यामागे ...
आपल्याच झाडास विळखा घालून
जग सुस्त अजगर बनतं
कधी मन उसळून येतं
बंधुभाव, चांगुलपणा
दया–माया–मानवता
सगळंच साफ झूठ वाटतं ...
२१–५–१९७१

# दुष्काळ

जमिनीच्या भेगांमधून
वाकडचा-तिकडचा झिरपत जातात
काळवंडलेल्या लाचार सावल्या
अस्थिपंजर शरिरांच्या...
गोळा करून वृद्ध त्राण
भेगाळलेल्या तळव्यांमध्ये
दोन घोट पाण्यासाठी
जथे चालले शरिरांचे...
आई-बाप, भावंडांची
नाती सगळी करपून चालली
सुरकुतलेल्या चेहऱ्यांची
नामहीन रांग बनली...
कसायांच्या कुंपणामध्ये
रांग पवळचा-ढवळचांची
रास पडली पलीकडे
पिळवटलेल्या हृदयांची...

५-३-१९७३

## कंडक्टर

सतरंजीची भोके बुजवीत
छोटा मुलगा जेव्हा त्याचा
साखरझोपेत मग्न असतो
तेव्हा खाकी पोषाख चढवून
साईबाबास हात जोडून
खिशामध्ये घाईत कोंबत
पुडकं गरम चपात्यांचं
जवळच्याच डेपोकडे
कंडक्टर धाव घेतो...
सहकाऱ्यांत हसत-खेळत
एक सिंगल चहा घेतो
थोड्याच वेळात लाल गाडीत
दोनदा छोटी टिंग-टिंग करतो...
असा दिवस सुरू होतो
दिवसभर प्रवास करतो
तोल सावरत, घंटी वाजवत
अधून-मधून घाम पुसत
तिकिटांना भोके पाडत
कंडक्टर टिक्-टिक् करतो...
'सिर्फ दो' म्हणता म्हणता

अर्धा इञ्जन आत घेतो
' ब्लू शर्ट आगे बढो
एक साईडसे रास्ता छोडो
छुट्टा नही, नीचे उतरो
भाईसाब ग्रँटरोड आया
रूईया कॉलेज–बंबखाना...'
असलंच सारखं बोलत असतो...
कधी–कधी भांडण करतो
तळतळून घसा फोडतो
पॅसेंजर्सच्या शिव्या ऐकतो
सहज एकदा विचार करतो
असल्या भांडखोर उतारूंना
' सौजन्यसप्ताह ' का नसतो ? ...
सूर्य बुडतो, दिवस थकतो
शांत होऊन कंडक्टर
चाळीमध्ये परत येतो
पेपरामधील हेडींगमधला
गरिबांचा कैवार वाचतो–
खर्चावरती विचार करतो
छोटया मुलास गोष्ट सांगतो...
झोपता–झोपता हळूच त्याची
भोळीभाबडी लक्ष्मी म्हणते
' फार थकलात ? पाय दाबू ?'
कंडक्टर सगळे श्रम
चुटकीसरशी विसरून जातो
सकाळीच उठण्यासाठी
गाढ–गाढ झोपी जातो...

१५–८–१९७१

## इराणी

पिंगट केस, गोबरे गाल
तुंदिल तनू, तोंडात पान
ओठांमध्ये सिगरेट छान
कौंटरवरच्या इराण्याची
होतेय ऐसपैस हालचाल...
'शलाम शाब' म्हणून खास
गिऱ्हाईकांस बांधून घेतो
हॉटेलमधील पोऱ्या लोकांस
शिवी घालून धाकात ठेवतो–
दोन दिवसांमधून एकदा
कौंटरवरील बरणीमधून
प्रत्येकाला चॉकलेट देतो...
लांब–रुंद आरशांमध्ये
स्वच्छ ट्यूब चमकत असते
पावडर्स–साबण, टुथपेस्ट–तेले
बिस्किटांचे रंगीत डबे
सगळे कसे चुपचाप बसले
सरकणाऱ्या काचेमागे
त्यांच्यामध्ये बुडून जातात
इराण्याचे निळसर डोळे...

२३७० २१८६१

सकाळपासून रात्रीपर्यंत
हॉटेलमध्ये हैदोस असतो
इराण्याच्या गल्ल्यामध्ये
बराच पैका जमा होतो
इराण्याचा गबदुल हात
पोऱ्या लोकांस पैसे वाटतो...
नीरव रात्री अकरा वाजता
टेलीफोन शांत असतो
फ्रीज संथ घरघर करतो
दारामधला वजन-काटा
आरामशीर पेंगत असतो
एखाद-दुसरा गिऱ्हाईक
आपल्याच तंद्रीत खात असतो...
कौंटरवरचा इराणी
रेडिओ-इराण चालू करून
ट्रांझिस्टर कानास लावतो-
इराणमधील आठवणींच्या
बदाम-पिश्त्यांत बुडून जातो
थरथरणाऱ्या आर्त खोल
आलापांनी भारून येतो
तसबिरीतल्या शहेनशहास
डोळे मिटून 'शलाम' करतो...

४-१०-१९७१

## साईड हिरो

कधी काळी त्याच्याजवळ
होती एक फियाट गाडी
त्याच्या एका दर्शनाने
हाय हुय करीत पोरीबाळी...
साईड हिरो म्हणून त्याने
बरीच खेचली होती गर्दी
त्याच्यासुद्धा सहीसाठी
झुंबड होती निर्मात्यांची...
ऑटोग्राफर्स–हंटर्स
फोटोग्राफर्स
लाऊड स्पीकर्स
लवले होते त्याच्यासाठी
एके काळी...
सगळं टिकलं काही धुंद
चमचमणाऱ्या क्षणांसाठी...
बरीच वर्षे नंतर गेली
आज त्याची भेट घडली
विरार लोकल प्लॅटफॉर्मवरती !
रंगीत शर्ट–
उसवलेला खांद्यावरती

उंची बूट–
ठिगळलेले बाजूवरती
करडी झांक केसांवरती
अंगठीचा वण
बोटावरती...
मी त्याच्याजवळ गेलो
थोडं हसून इतकंच बोललो
'तुमच्यासारखा अभिनेता
फारच क्वचित् हल्ली दिसतो...'
एकदम उजळला चेहरा त्याचा
त्याने माझा हात धरून
मला पाजला कोकाकोला
स्टॉलवरती पैसे देण्यास
त्याने खिशात हात घातला–
हात तसाच खिशात ठेवून
केविलवाणं लाचार हसला
एकेकाळचा साईड हिरो
गर्दीमध्ये विरून गेला...

५–८–१९७१

# एक ‘ योद्धा ’

एक ‘ योद्धा ’ लढत होता
एकसारखा निवडणुका !
पुन्हा पडला, पुन्हा उठला
डिपॉझिटला पुन्हा मुकला...
तारुण्याच्या रंगीत काळी
खूप स्वप्ने पाहू लागला
स्वप्नामधील लोकसभेत
एम्. पी. म्हणून बसू लागला...
‘ संग्राम ’ पहिला
चांगलाच रंगला
सर्वात कमी मते घेऊन
आमचा योद्धा ‘ फेमस ’ झाला...
लोकसभा, विधानसभा
‘ मुन्शीपाल्टी ’मधील जागा
यांच्यासाठी खूप लढला—
अजून नाही निवडून आला...
आत्ताच उलटली त्याची साठी
प्रश्न आपला सहज केला
‘ इतक्या सॉलिड आरोग्याचा
साठ नाबाद मिळविण्याचा

तुमचा मार्ग आहे कुठला ? '
तेव्हा योद्धा उत्तरला
' एक लग्न, एक भार्या
एक मुलगी, एक मुलगा
आणि त्यांच्या जोडीला
नगद नऊ निवडणुका ...'

१९-३-१९६८

## दलाल

केवळ एक अपघात म्हणून
शरिरांच्या बाजाराच्या
एका कोंदट कोपऱ्यामध्ये
टाहो फोडत जन्मास आला !
काही कळू लागण्यापूर्वीच
उकिरड्यातील कोयीमधल्या
लाल तांबूस कोंबासारखा
गल्लीमधल्या महंमदच्या
हॉटेलमध्ये वाढू लागला...
वखवखलेल्या गिऱ्हाईकांस
जळजळीत चोरटा ग्लास
देण्यामध्ये तयार झाला...
सुरीहल्ले, मारामाऱ्या
अचकट विचकट शाप–शिव्या
यांच्या खतात मोठा झाला
मटका–जुगार खेळू लागला
चमचम बिजली नखरेवाल्या
सुलेखाचा दलाल झाला...

पांढऱ्या सफेद लेंग्यावरती

नक्षीदार झब्बा आला
'एकसो–बीस 'ची पट्टी तोंडात
कानात फाया ठेवू लागला
तीक्ष्ण नजर लावून दलाल
गिऱ्हाईकांस हेरू लागला...

एके दिवशी दलाल एकटा
सिनेमाला जाऊन बसला
माँ–बहन–सच्चा–प्यार–
वगैरे ऐकून पेटून उठला
पायाजवळ पचकन् थुंकून
थिएटरच्या बाहेर पडला
संध्याकाळी खूप खेळला
खूप हरला–खूप प्याला
अपघातात सापडून मेला

अपघाती जन्म झाला
अपघाती मृत्यु आला
शरिरांच्या बाजाराला
एक दलाल कमी झाला...

५–४–१९७३

## दहावीच्या बाई

'आलास बाबा दिवसांत किती
आधी तर ओळखलंच नाही
आजकाल कमी दिसतं
उडून गेल्या बुलबुलांची
नावं आठवणं कठीण जातं...'
आवाज तसाच– थोडा कापरा
वेष तसाच– शुभ्र पांढरा
फरक इतकाच–
डोक्यावरती टोप पांढरा
चेहऱ्यावरती भार आणि
पुसट स्पष्ट सुरकुत्यांचा...
'ये ! बस ! अगदी घरासारखा
थांब तुला चिवडा आणते–
आमची कधी आठवण येते ? ...'
'आज काल काय करतोस ? '
'जरा मोठ्यानी – '
'अरे वा !
बराच मोठा झालास की रे !
मला छोटं काम बघशील ?
पोकळ क्षणांस विरंगुळा देशील ? ...'

'जे अजून शाळेत शिकवतात
फक्त त्यांनाच शिकवण्या मिळतात
परिक्षेपुरत्या ज्ञानासाठी – '
गळ्यामध्ये रूळत असते
मोती–माळ तीच जुनी ...
'नवीन नवीन वाचत रहा
ज्ञान आपलं वाढवत रहा
खूप लिही, हो मोठ्ठा
मार्ग आहे जिथे इच्छा–
एके काळी शिकवलं तुला
वाटू दे अभिमान मला ...'
'काय म्हटलंस ? जातोस आता ?
बरं तर– मजा करा
कृतघ्न बेगडी जगामध्ये
पाय रोवून यश मिळवा
टक्कर घेताना सावध रहा–
आमची अशीच आठवण ठेवा
खूप आनंद झाला मला ...'

उभ्या गजांच्या छोट्या खिडकीत
बाईंचा हात हलत असतो
पाणावलेल्या माझ्या डोळ्यांत
अंधुक अंधुक होत जातो ...

५–४–१९७३

## बाजार

इथल्याच पुढच्या नाक्यावरला
बाजार अगदी फुलून गेला
कलकलाटास ऊत आला
घासाघीस ऐकून ऐकून
फुटपाथांना वीट आला...
कोपऱ्यावरला पेपरवाला
हळूच म्हणतो, 'आकडा लागला'
'आठ आनेमे सबकुछ'वाला
बरीच गर्दी खेचू लागला...
लाईनमधले भाजीवाले
आता बरेच रंगात आले
हळू-हळू पोत्याखाली
बरेच आणे जमू लागले...
निळा पोषाख, हातात लाठी
घेऊन दोन-चार पोलीस आले
'ग्रेड वन' काही चालले
खिसेकापू त्यांच्यामागे...
ऑफिसमध्ये बरेच राबून
दोन कारकून चहा प्याले
राजकारणाबद्दल त्यांचे

विचार बरेच 'प्रखर' झाले...
कोपऱ्यावरती उभे राहिले
हिरोछाप फिट पँटवाले
बॉबकटवाली, साडीवाली
यांच्याकडे बघत बसले...
धोतर, लुंगी, लेंगा, झब्बा
यांचा माजला हल्लागुल्ला
स्कर्ट, साडी, फ्रॉक यांच्या
कचकचीला रंग चढला
बाजार आता बेजार झाला...
अर्क आहे समाजाचा
बाजार पुढच्या नाक्यावरला...

१९-३-१९६८

## गेट वे

गेट वे ऑफ इंडियावर
झिरपणाऱ्या संधिप्रकाशात
डुचमळणाऱ्या किनाऱ्यावर
कुटुंबवत्सल छोटया बोटी
मजेदार ये–जा करतात
धक्क्यावरती रंगीत माणसं
भेळीचे कागद पाण्यात फेकतात...
बोटांत बोटे गुंफून दोघे
नजरबंदीत हरवून जातात
शिवाजीच्या पुतळ्यापुढे
चोरटे गॉगल्स स्वस्तात मिळतात...
पिपाण्यांच्या संगीताला
घोगरे भोंगे साथ देतात
ट्रांझिस्टरच्या उडत्या गाण्यांत
झुलपेवाले लचकत फिरतात
दूरवरच्या क्लबमध्ये
अडखळती पावलं ताल धरतात...
छोटे जीव किलबिलणारे
आईस्क्रीममध्ये दंग असतात
कुस्तीवाली उघडी पोरे

चणेवाल्यास गळ घालतात
टूट्या दिलास कुरवाळणारे
क्षितिजाला निरखीत बसतात...
वृद्ध भिकारीण धुंडीत येते
लांबलचक मोटारींचे
खिदळणारे सेंटेड थवे–
फुगेवाल्याकडे मिळतात
भुसाभरले कागदी रावे...

३–५–१९७४

# व्यापार-रस्ता

निरूंद, लांबट व्यापार-रस्त्यात
सावध, शोधक कोलाहलात
एक पाऊल अंतरामध्ये
मोजून दोन धक्के मिळतात
सटक–फटक, रोख–उधार
सटक–फटक, रोख–उधार
एकाच तालात पावलं पडतात
कळकट कप–बश्या हातात
खाते–वह्या बाळगत खिश्यात
इथे घामट पोरे फिरतात
आजच्या चालू भावावरती
जागोजागी वाद झडतात...
'बँक तो काले बंद छे'
'चलनपर साईन ले'
'तीनसोके आसपास पटा दे'
टेलीफोन एन्गेज्ड् असतात
व्यापार–रस्त्यात कडेकडेनी
जुने कागद साचत असतात...
चढत्या सूर्यात, वाळूच्या ढिगात
दोन कुत्री पेंगू लागतात

मशिदीच्या पायरीजवळ
डोक्याखाली पाट्या ठेवून
पाटीवाले थकून घोरतात–
हातगाड्या मध्येच उठतात
निरुंद लांबट व्यापार–रस्त्यात
सटक–फटक, रोख उधार
सटक–फटक, रोख–उधार
एकाच तालात पावलं पडतात...

१८–१२–१९७३

## दाद

चितेतून उठणाऱ्या धुराच्या आवर्तांनी
झाडांच्या शेंड्यांवर–पानाच्या देठाशी
ढगांच्या कडांवर–झऱ्याच्या काठाशी
विखरल्या त्याच्या कवितांच्या ओळी ...

सळसळली झाडं–ठिपकली पानं
ढगांतून पाझरलं–झऱ्यातून उमटलं
अश्रूंचं गाणं ...

बाकी जग पूर्वीसारखंच
बहिऱ्याचं ढोंग वेटाळून होतं ...

११–३–१९७४

## अनामिक

बकुळीच्या वळणावरून
प्राजक्ताच्या सड्याजवळ
पेंगुळलेल्या रातराणीत
तुझं येणं...
तुझं येणं, बघणं, हसणं
होतं सुंदर कोरीव लेणं
हळूच माझे कान ऐकतात
दंवाची ती नाजुक पावलं...
फिक्कट निळसर धुक्यामधून
मला एक तृप्ती देऊन
मांगल्याच्या किरणांवरून
तुझं जाणं...

५-१०-१९६७

## रिमझिम

तुझ्या अस्तित्वाची रिमझिम
हृदयतृणास स्पर्शून जाते
मन माझे हलके होऊन
गवतावरचे फूल होते...

तुझ्या वात्सल्याची रिमझिम
मोतियांची माळ बनते
उजाड झाल्या अंतःकरणास
पोपटी रंगात सजवून जाते...

तुझ्या मांगल्याची रिमझिम
चंदेरी एक तृप्ती देते
जीवनाच्या माळरानास
एक नवे जीवन देते...

२४-७-१९६८

## एकदा वाटलं

एकदा वाटलं
गहिऱ्या निळ्या आभाळातून
चांदण्यांना वेचत यावं
भल्या पहाटे प्राजक्ताच्या
वर्षावांनी धुंदून जावं
क्षितिजाच्या हळव्या रेषेत
अंतर्मनास झोकून द्यावं
उमलणाऱ्या मोगऱ्याजवळ
हृदयाचं गीत गावं ...
मग वाटलं,
त्यापेक्षा इतकंच व्हावं
तुझ्या वात्सल्याच्या छायेत
माझं विश्व फुलून जावं ...

२८-४-१९७२

# नेत्र

बुद्ध–नेत्र
परागस्पर्शी, मिटलेले
ख्रिस्त–नेत्र
क्षमार्द्र कारुण्ये
ऊर भरून खूप सांगतायत–
ऐकायला कान हवेत
समजायला मन हवे …

२८–६–१९७३

## स्वप्नं

चांदण्यांना स्वप्नं पडतात
लाटांमध्ये फेसाळण्याची
हिरवळीला स्वप्नं पडतात
इंद्रधनूत विरघळण्याची
स्वप्नांना पण स्वप्नं पडतात
स्वप्नामध्ये हरवण्याची–
स्वप्नांच्या क्षितिजावर अर्थहीन वरात
असंख्य मालवत्या काजव्यांची...

३–५–१९७३

# असेच....

अशीच फरफटणार रक्ताळ पावलं
कुरकुरीत, धूळकट वादळी पानं–
सहा मिनटी सिग्रेटीचा तोच शौक
आणि शोक !
गणक नेत्रांचे लाखो ठसे
तारांगणात असेच उमटणार
आणा–शपथांचे भावुक ससे
चंद्रावर वगैरे असेच उधळणार–

सांजसावल्या अशाच पसरणार
आठवणग्रस्त झिजकी गाणी
पुन्हा–पुन्हा अशीच विव्हळणार ऽऽ

मरून पडल्या चतुरांचे
शिराशिरांचे तपकिरी पंख
दिव्या–दिव्यांच्या खांबांखाली
असेच थरकणार–असेच सरकणार–

...हे असेच...हेही असेच...
आणि हेसुद्धा असेच...

६–७–१९७३

## दृष्ट

झाडांच्या नक्षीतून, चांदण्यांच्या देशाकडे
तो असाच निघून गेला
मखमली कवडशी पायघड्या
पावलांपुढे उलगडत गेला...
बरं झालं–
कधीच वळून पाहिलं नाही
त्याच्या डोळ्यांतील चंदेरी स्वप्नास
माझी दृष्ट लागली असती...

३–१०–१९७३

## पालवी

माझ्या वेड्या मनामधल्या
अस्फुट कोवळ्या पालवीमधलं
एक मुग्ध नाजुक पान
तुझ्या मनात डुलताना दिसलं–
जाई–मोगऱ्याची लाख फुलं
सर्वांगावर झुलली वाटलं...

१२–४–१९७३

## दुवा

तुझ्या-माझ्यामध्ये झुले
गीतगंगा चांदण्यांची
चांदण्यात झळकते
फेनरेषा मोगरीची...

तुझ्या–माझ्यामध्ये फुले
भावलेणी प्राजक्ताची
प्राजक्तात झुळझुळे
स्वप्नगंधा सावरीची...

तुझ्या–माझ्यामध्ये खुले
आर्त माला आसवांची
आसवात उमलते
आस धुंद पहाटेची...

१४–४–१९७३

## कविता मधुचंद्राची

उत्तरात्रींनी ऐकली
जागत्या पैंजणांची
लाजरी रुणझुण
स्वतःलाच विसरून
धुक्यात अदृश्य होत गेलेली...
आसमंतात बहरून आली पहाट-
सोनेरी किरणं
वनराईत झिरपताना
या झाडांच्या सळसळीने
ऐकली आमची प्रेमगीतं...
प्रत्येक पहाट अशीच उगवेल
झाडं ?
नेहमीच गातील ऐकलेली प्रेमगीतं...

१७-१-१९७५

## आग

आग विझवायला पाणी नाही
अशा विराट शहरातून
पेटल्या वस्त्रांनी तो पळत होता...
आंधळ्या-बहिऱ्यांनी ओसंडलेल्या
निर्विकार घरांच्या अनेक वस्त्या
ओलांडित आला शहराबाहेर-
तिथेच कोसळला
शरीरावर अग्नी विझला-
शहरातून वाहू लागल्या
आपुलकीच्या कोरड्या नद्या...

२८-३-१९७५

# आपली कविता

संपृक्त मेघ पराभूत क्षणांचे
सरकत जातात
दाट सावल्या पसरत–पसरत
प्रतिसाद येतो लाख चुकचुकींचा
सावल्या अधिकच घट्ट होतात–
नग्न, अतृप्त लाव्हा–लाटा...
पळणार म्हणतोस ?
पळवाटांचे शेवट जखडलेत
वर्षावाच्या अटळ पायथ्याशी
तृप्त लाटांच्या शेवटाशी...

२१–६–१९७४

## लिलाव

कोसळत्या छपरांच्या जाहीर लिलावात
कंठ फोडीत ललकारत गेलो
'एक वार–दोन वार–तीन वार–'
बेहोष घोषणा ऐकत गेलो...
सरकणाऱ्या लाचार सावल्या
बुबुळांना दिसल्याच नाहीत
चुरगळलेल्या पराभूत हाका
कानांमध्ये शिरल्याच नाहीत–
एक गोष्ट साफ विसरलो !
कोसळत्या छपरांच्या जाहीर लिलावात
दोन छपरं आपलीच होती...

REFBK-0021761
REFBK-0021761
२३-९-१९७३